
दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com    epaper. lokrakshanay.com    dainiklokrakshanay@gmail.com

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२४३ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, मंगळवार, १३ फेब्रुवारी २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## 'लवकरच भारताच्या भूमीवर कुलभूषण जाधव यांचही आगमन होऊ दे'; माजी नौदल अधिकाऱ्यांच्या सुटकेनंतर राज ठाकरेंची इच्छा !



■मुंबई। यश सावंत,


मुंबई- हेरगिरीचा आरोप करत कतारमधील न्यायालयाने भारताच्या आठ माजी नौदल अधिका यांना फाशीची शिक्षा सुनावल्याने खळबळ उडाली होती. मात्र या प्रकरणामध्ये भारत सरकारच्या मुत्सद्देगिरीचा मोठा विजय झाला आहे. फाशीची शिक्षा सुनावलेल्या या आठही भारतीय माजी नौदल अधिकाऱ्यांची मुक्तता केली असून, त्यापैकी ७ जण मायदेशी परतले आहेत. दरम्यान, आता मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केंद्र सरकारचे अभिनंदन केले असून कुलभूषण जाधव यांचेही लवकरच भारताच्या भूमीवर आगमन होऊ दे, अशी मागणी केली आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी ट्विट करुन केंद्र सरकारचे अभिनंदन केले. ट्विटमध्ये म्हटले की, कतारमध्ये भारतीय नौदलाच्या ८ अधिकाऱ्यांना हेरगिरीच्या आरोपाखाली अटक करून फाशीची शिक्षा सुनावली होती. पण भारत सरकारच्या मुत्सद्देगिरीने त्या सर्व अधिकाऱ्यांची सुटका झाली, ह्याबद्दल सरकारचं अभिनंदन', आता अशीच मुत्सद्देगिरी कुलभूषण जाधव ह्यांच्याबाबत पण दिसू दे आणि लवकरच भारताच्या भूमीवर त्यांचं आगमन होऊ दे ही इच्छा !, अशी मागणीही ट्विटमध्ये केली आहे.

हेरगिरीचा आरोप करत कतारमधील न्यायालयाने भारताच्या आठ माजी नौदल अधिका यांना फाशीची शिक्षा सुनावल्याने खळबळ उडाली होती. मात्र या प्रकरणामध्ये भारत सरकारच्या मुत्सद्देगिरीचा मोठा विजय झाला आहे. फाशीची शिक्षा सुनावलेल्या या आठही भारतीय माजी नौदल अधिका यांची मुक्तता केली असून, त्यापैकी ७ जण मायदेशी परतले आहेत. याआधी या प्रकरणात भारताने कतारसोबत राजनैतिक पातळीवर चर्चा केल्यानंतर या आठ जणांना सुनावण्यात आलेली मृत्युदंडाची शिक्षा कमी करून कारावासाची शिक्षा सुनावली होती. या आठ माजी नौदल अधिका यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आल्याने त्यांच्या नातेवाईकांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं होतं. तसेच या अधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांनी परराष्ट्र मंत्रालयाला विनंती केल्यानंतर सर्व राजनैतिक माध्यमांचा वापर करून त्यांना परत आणण्यासाठी कायदेशीर मदत केली जाईल, असं आश्वासन परराष्ट्र मंत्रालयानं दिलं होतं. दरम्यान, कतारमध्ये फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेल्या आठ अधिका यांची सुटका झाली असून, त्यापैकी ७ जण मायदेशी परतल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे.

## पुणे महानगरपालिका आयुक्तांची 'बायो एन्जाईम्स' वापरून जलपणीर्चा नैसर्गिकरित्या खात्मा करण्याच्या प्रयोगाची पाहणी

■पुणे, अभिजित येरल्लू

पुणे महानगरपालिकेचे आयुक्त विक्रम कुमार यांनी पाषाण तलाव येथे भेट देऊन ह्याबायो एन्जाईम्सह्म वापरून जलपणीर्चा नैसर्गिक रित्या खात्मा करण्याच्या प्रयोगाची पाहणी केली. तसेच खराडी सारखा डासांचा प्रश्न पुणे शहरात इतरत्र उद्भवू नये म्हणून हा प्रयोग संपूर्ण पुणे शहरात कसा व्यवहार्य होईल याची माहिती घेतली. पुण्यातीत खराडी नदीपात्रासोबत कात्रज, पाषाण, जांभुळकर तलाव आणि मुळामुठा नदीत जलपणीर्ची मोठी समस्या आहे. येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढते. शिवाय पोषक वातावरण तयार होऊन डासांची पैदास मोठ्या प्रमाणात होते. संपूर्ण पुणे शहराला डासांचा त्रास सहन करावा लागतो. ही जलपर्णी हटवण्याकरता महानगरपालिकेचा दरवर्षी करोडो रुपयांचा निधी खर्च होतो. शिवाय तरीही जलपणीर्ची समस्या कायम राहते. या समस्येचे



निराकरण करण्यासाठी आठ दिवसांपूर्वी पुणे महानगरपालिकेने पाषाण तलावात एक अनोखा प्रयोग सुरू केला आहे. या तलावातील पाण्यात बायो एन्झाईम्सची पाकिटे सोडून पाण्यातील चांगल्या बॅक्टेरियांच्या मदतीने जलपणीर्ला आवश्यक घटक नष्ट करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रयोगामध्ये पाण्याची ऑक्सिजन पातळीही वाढते. जलपणीर्चे खाद्य असलेले अशुद्ध घटक नष्ट झाल्यामुळे जलपर्णी मरते. आठ दिवसात पाषाण तलावातील जलपर्णी मरायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे पाषाण तलाव येथे या प्रयोगाचे सकारात्मक निष्कर्ष समोर आल्याचे अधिकाऱ्यांनी आयुक्तांना दाखवले. आणखी आठ दिवसानंतर अंतिम निष्कर्ष समोर येतील. त्यानंतर हा प्रयोग संपूर्ण पुणे शहरातील जलसाठ्यात राबवण्याविषयी आणि त्याच्या व्यावहारिकते विषयी पुणे महापालिका निर्णय घेईल, असे पुणे महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाचे उपाभियंता दिलीप पावरा यांनी सांगितले.

## प्रतापगडावर बुरुजाच्या दुरुस्तीत कडप्पांचा वापर; शिवप्रेमी आणि प्रतापगडवरील ग्रामस्थ संतप्त

■पोलादपूर, दिगंबर जाधव :

किल्ले प्रतापगडावरील ध्वज बुरुजाच्या पुनर्बांधणीत दगडाऐवजी चक्क कडप्प्याचा वापर होत आहे. यामुळे शिवप्रेमी आणि प्रतापगडवरील ग्रामस्थांमधून संताप व्यक्त करण्यात आल्यावर पुरातत्त्व विभागाने हे काम बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांचे वैभव जपण्याचे काम सध्या सुरू आहे, मात्र प्रतापगडावर सह्याद्री प्रतिष्ठानमार्फत बुरुजाची डागडुजी करताना कडप्पा लावण्याचे काम सुरू होते. किल्ले प्रतापगडचा नुकताच जागतिक वारसा स्थळांच्या नामांकन यादीत समावेश झाला आहे. त्यामुळे किल्ल्यावर होणारी सर्व कामे पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून होणे गरजेचे आहे. असे असताना किल्ले प्रतापगडाचा समावेश केंद्र व राज्य संरक्षित स्थळांच्या यादीत नसल्याने निधीअभावी अनेक वर्षांपासून काम रखडले होते. पडझड झालेल्या ध्वज बुरुजाचे काम दोन वर्षांपासून सह्याद्री प्रतिष्ठान या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून लोकवर्गणीतून करण्यात येत आहे. या कामाला विरोध वाढत असल्याने काम बंद करण्याचा सूचना पुरातत्त्व विभागाने केल्या आहेत. त्यानंतर प्रतिष्ठानने काम बंद केले. तटबंदी ढासळल्यानंतर सह्याद्री प्रतिष्ठानने त्या परिसरात दुरुस्ती केली होती, त्यानंतर ध्वज बुरूज ढासळला. त्या परिसरातही दुरुस्तीचे काम लोकवर्गणीतून संस्थेने सुरू केले होते. परंतु वारसा स्थळाच्या अनुषंगाने काम होत नसल्याने ग्रामस्थ



आणि शिवप्रेमींमध्ये नाराजी होती. याबाबत तक्रारी आल्यानंतर व पुरातत्त्व विभागाला या वर्षी निधी उपलब्ध झाल्याने प्रतिष्ठानला बुरुजाच्या डागडुजीचे काम थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्य जागतिक वारसा स्थळांच्या यादीत नामांकन होण्यासाठी लवकरात लवकर बुरुजाची दुरुस्ती करण्यात येणार असल्याचे पुरातत्त्व विभागाकडून सांगण्यात आले आहे. किल्ले प्रतापगडावर तटबंदीच्या कामासाठी कडप्पाचा वापर करण्यात येत आहे. याबाबत ग्रामस्थांनी आवाज उठवल्यानंतर दुरुस्तीचे काम बंद करण्यात आले आहे.

-मृणाल उतेकर, ग्रामस्थ, प्रतापगड

महाराष्ट्रातील गडकिल्यांचे वैभव जपण्याचे काम नेहमीच सुरू असते. किल्ल्यांवरील डागडुजीचे काम दगडापासून होणे गरजेचे आहे, मात्र प्रतापगडावर बुरुजाच्या कामासाठी टाईल्सचा वापर केला जात आहे त्यामुळे हे काम बंद पाडले आहे. पुरातत्त्व विभागानेही काम बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## नैना क्षेत्रातही युडीसीपीआर लागू करण्याचा विचार; उदय सामंत यांची माहिती

■नवी मुंबई, भावना जैन :

सिडकोच्या नैना परिक्षेत्रातील गावांना एकत्रिकृत विकास नियंत्रण आणि संवर्धन विनियमन (युडीसीपीआर) लागू करण्याबाबत शासन सकारात्मक विचार करेल, असे आश्वासन रायगड आणि रत्न ागिरी जिल्हा पालकमंत्री तथा राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिले आहे. कोकण भवन विभागीय आयुक्त कार्यालयात सोमवारी नैना परिक्षेत्रातील समस्यांबाबत सर्व पक्षीय बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीस आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार बाळाराम पाटील यांच्यासह जे. एम.म्हात्रे, बबन पाटील, रामदास शेवाळे, अरुणशेठ भगत तसेच संबंधित शासकीय अधिकारी उपस्थित होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव क्षेत्राकरीता नैना विशेष नियोजन प्राधिकरण सिडकोची नियुक्ती केली आहे. त्यासाठी अधिसूचित केलेल्या क्षेत्रात पनवेल, उरण व पेण तालुक्यातील 175 गावांचा समावेश आहे. त्यापैकी अधिसूचित क्षेत्रामध्ये 23 गावांचा अंतरीम प्रारुप विकास आराखडा शासनाने यापूर्वीच मंजूर केली आहे. उर्वरित 152 गावांचा प्रारुप विकास योजना 16 सप्टेंबर,2022 रोजीच्या अधिसूचनेनुसार



मंजूर झाली आहे. त्यामुळे नैना परिक्षेत्रात युडीसीपीआर लागू झाल्यास अनेक प्रश्न मार्गी लागतील, असेही उदय सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थित कोकण भवन येथे महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग विकास महामंडळाच्या विविध प्रश्नांबाबत खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष रविंद्र साठे यांच्या उपस्थितीत विविध प्रश्नांबाबत चर्चा करण्यात आली. या चचेअंतर्गत खादी ग्रामोद्योग मंडळाच्या हात कागद संस्था,पुणे यासाठी 1 कोटी रुपये आणि खादी भवनाच्या इमारत दुरुस्तीसाठी 2 कोटी रुपये अनुदान देण्याला सामंत यांनी तत्वतः मान्यता दिली. विश्वकर्मा योजना ग्रामीण भागापर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## ठाण्यातील ९८ अनधिकृत बांधकामे ठाणे महानगरपालिकेकडून जमीनदोस्त



■ठाणे, विशाल कारंडे :

महापलिका क्षेत्रात उभ्या राहणाऱ्या अनधिकृत बांधकामांवरून पालिका प्रशासनावर चौफेर टीका करण्यात आली; तर विधानसभेतदेखील या मुद्द्यावरून विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी सर्व अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार १ जानेवारी ते ५ फेब्रुवारी या महिनाभराच्या कालावधीत ९८ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली असून ११ जणांवर एमआरटीपीअंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत; तर नऊ बांधकामांना नोटिसा बजावण्यात आल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात उभ्या राहणाऱ्या अनधिकृत बांधकामांवरून पालिका प्रशासनावर लोकप्रतिनिधींसह सामाजिक कार्यकर्त्यांनीदेखील आवाज उठवला होता; मात्र पालिका प्रशासनाकडून या बांधकामांवर थातुरमातुर कारवाई करण्यात येत होती. त्यानंतर पुन्हा ही बांधकामे उभी राहत होती. याच प्रकारावरून भाजपचे आमदार संजय केळकर यांनीदेखील अनेकदा पालिका आयुक्तांकडे तक्रारदेखील केली होती. त्यातच नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात आमदार केळकर यांनी अनधिकृत बांधकामंचा मुद्दा उपस्थित केला. या मुद्द्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार ठाणे महापलिका आयुक्तांनी त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. ठाणे पालिका क्षेत्रातील कळवा, मुंब्रा, दिवा आणि माजिवाडा, मानपाडा या प्रभाग समिती क्षेत्रात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. १ जानेवारी ते ५ फेब्रुवारी या कालावधीत ९८ बांधकामे जमीनदोस्त केली आहेत; तर ११ जणांवर एमआरटीपीअंतर्गत गुन्हे दाखल केले असून ९ बांधकामांना नोटिसा बजावण्यात आल्या. यात सर्वाधिक कारवाई दिवा

## आता लवकरच येणार 'एक देश, एक कॅलेंडर'; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू करणार प्रकाशन




■नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

देशात विविध सण, उत्सवावेळी असलेल्या वेगवेगळ्या तिथींवरून दरवर्षी गोंधळ होतो. एका राज्यात वेगळी, तर दुसऱ्या राज्यात वेगळ्या दिवशी सण साजरा केला जातो, सुटीही वेळ्वेगळ्या दिवशी दिली जाते. त्यावरून होणारा गोंधळ टाळण्यासाठी एक देश, एक कॅलेंडरच्या धर्तीवर एकसंध हिंदू पंचांग तयार केले जात आहे. त्याची जबाबदारी केंद्रीय संस्कृत विद्यापीठाकडे देण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते लवकरच या पंचांगाचे प्रकाशन होणार आहे. नव्या पंचांगामुळे देशातील सण-उत्सवांच्या तिथींवरून होणारा गोंधळ दूर होईल. नवे पंचांग हे देशातील सर्व पंचांगांचा अभ्यास करून नक्षत्र, योग, सूर्य आणि चंद्राच्या गतीच्या आधारे तयार करण्यात आल्याचे ज्योतिषाचार्यांनी म्हटले आहे. सुरुवातीला हे पंचांग केवळ केंद्रीय संस्कृत विद्यापीठापुरतेच मर्यादित होते. परंतु नंतर ते सर्वत्र वापरात आणण्याचा निर्णय झाला. तसेच अधिकाधिक लोकांपर्यंत ते पोहोचविण्यासाठी ॲपही विकसित केले जात असल्याचे सांगण्यात आले.

## आता ज्येष्ठांना व गर्भवती महिलांना मेट्रो ट्रेनमध्ये असणार राखीव सीट !

■मुंबई, नितीन देवळेकर

मेट्रो ट्रेनने प्रवास करणाऱ्या ज्येष्ठांना आणि गर्भवती महिलांनासाठी खूशखबर आहे. मेट्रोची दैनंदिन प्रवासी संख्या तीन लाखापर्यंत पोहोचल्याने प्रवाशांना दाटीवाटीने प्रवास करावा लागतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसह गर्भवती महिलांची प्रवास दरम्यान मोठी गैरसोय होते. त्यापार्श्वभूमीवर सध्या ज्येष्ठांसाठी असलेली राखीव सीटची संख्या वाढवण्याबरोबरच गर्भवती महिलांसाठी राखीव सीट ठेवण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. एमएमआरडीएकडून सध्या अंधेरी-गुंदवली दरम्यान सहा डब्यांच्या २२ मेट्रो ट्रेन चालवल्या जातात. वाहतूक कोंडीशिवाय गारेगार प्रवास करता येत असल्याने प्रवाशांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांची मोठी




संख्या आहे. मात्र सध्या ६ डब्यांच्या गाडीत एक डबा महिलांसाठी राखीव आहे, तर उर्वरित पाच डब्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव सीट असल्या तरी त्या अपुऱ्या ठरत आहेत. त्यामुळे अनेकदा वयस्क प्रवाशांना बसण्यासाठी जागा न मिळाल्याने उभा राहूनच प्रवास करावा लावतो. एमएमआरडीएचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी नुकताच मेट्रो ट्रेनने प्रवास करत प्रवाशांशी संवाद साधला. यावेळी ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांची गैरसोय होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

## घरातील वातावरण ठिक नसल्याने घर सोडून गेलेल्या त्या ५ मुलीं दिल्लीत सुखरूप सापडल्या

■नवी मुंबई, योगेश होळंब :

आई-वडीलांच्या त्रासाला कंटाळुन तसेच घरातील वातावरण ठिक नसल्याने तळोजा भागात राहणाऱ्या 5 ते 16 वयोगटातील 5 मुली स्वतहुन घर सोडून निघुन गेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाने या मुलींचा शोध घेऊन त्यांना दिल्लीतील गुडगाव येथून ताब्यात घेतल्यानंतर या पाचही मुलींचे अपहरण झाले नसल्याचे उघडकीस आले. या पाचही मुलींना पुढील कार्यवाहीसाठी तळोजा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या प्रकरणातील 14 वर्षीय मुलीला तिचे आई वडील शाळ शिकु देत नव्हते, ते तिला जबरदस्तीने भाजीपाल्याचा व्यवसाय करण्यास भाग पाडुन तिला मारहाण करत होते. तसेच तिच्या दोन लहान बहिणींना सुद्धा शिकण्याची आवड असताना त्यांना देखील




आई वडील शाळेत पाठवत नव्हते. त्यामुळे 14 वर्षीय मुलीने मागील 1 महिन्यापासून घर सोडुन जाण्याची तयारी केली होती. त्यासाठी तिने पैसे जमवुन ठेवले होते. तिला एकुण सात बहिणी असुन त्यापैकी 7 व 5 वर्षीय या दोन लहान बहिणींना घेवुन ती घरातुन बाहेर पडली होती. त्यावेळी रस्त्यामध्ये या तिघी बहिणींना त्यांच्या घराशेजारी राहणाऱ्या 16 व 14 वयोगटातील दोघी बहिणी भेटल्या. त्यांना त्या तिघी घर सोडुन जात असल्याचे सांगितल्यानंतर त्यांना ही शिक्षणाची आवड नसल्याने व त्यांच्या घरातील वातावरण ठिक नसल्याने त्यांनी त्यांच्या सोबत घर सोडुन जाण्याचे ठरवले. त्यानुसार या पाचही मुलींनी कोणाच्याही घरच्यांना काहीएक न कळू देता, गुपचुप सकाळी तळोजा येथुन ऑटो रिक्षाने खारघर रेल्वे स्टेशन येथे गेले. त्यानंतर त्यांनी वद्रि रेल्वे स्टेशन गाठून तेथून रेल्वेने दिल्ली येथे गेल्या. त्यानंतर दिल्लीतील गुडगांव येथे राहणाऱ्या 14 वर्षीय मुलीच्या मानलेला भावाकडे गेल्या होत्या. दरम्यान, तळोजा परिसरातुन 5 ते 16 वयोगटातील 5 मुली एका वेळेस गायब झाल्याने त्यांच्या पालकांनी सगळीकडे शोधा शोध करुन तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी या 5 मुलींच्या अपहरणाचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे, गुन्हे शाखा युनिट-2 उमेश गवळी, युनिट-3 चे पोलीस निरीक्षक मुलाणी तसेच इतर अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी तपास पथके तयार करण्यात आली.

## 'मुंबई - पुणे एक्स्प्रेस वे'सुरक्षा उपायांसाठी राहणार दोन तास बंद !



■मुंबई, सचिन कदम

मुंबई- पुणे एक्स्प्रेस वेच्या मुंबई वाहिनीवरहायवे ट्रॅफिक मॅनेजमेंटसिस्टम अंतर्गत वाहनांवर वॉच ठेवण्याकरिता सर्व्हिलन्स कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. त्यासाठी आवश्यक असलेली गॅन्ट्री बसवण्यासाठी मंगळवारी दुपारी १२ ते २ या वेळेत मुंबई वाहिनीवरील सर्व प्रकारची वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या बदलाची दखल घेत वाहनधारकांनी आपल्या प्रवासाचे नियोजन करावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने केले आहे. मुंबई- पुणे एक्सप्रेस वेवरून दररोज लाखो वाहने ये- जा करतात. अनेक वाहन चालक वेग मयार्देचे उल्लंघन करत असल्याने जीवघेणे अपघात घडतात. त्याला चाप लावण्यासाठी एमएसआरडीसी ठिकठिकाणी गॅन्ट्री उभारून त्यावर सर्व्हिलन्स कॅमेरे बसवणार आहे. त्याचाच भाग म्हणून एक्स्प्रेस वेच्या मुंबई वाहिनीवर १५.७५० किमी येथे गॅन्ट्री बसवण्यासाठी मंगळवारी दोन तसाच ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे पुण्याहून- मुंबईच्या दिशेने येणारी वाहतूक दोन तास बंद राहणार आहे. दरम्यान वाहनधारकांना ब्लॉक कालावधीत पयार्यी मागार्ने प्रवास करता येणार आहे. द्रुतगती मार्गावरुन पुणे ते मुंबई वाहिनीवरील (पुण्याहुन मुंबईकडे येणारी) हलकी वाहने मुंबई वाहिनीवर लेन किमी ५५ वरुन वळ्वुन मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ या जुना पुणे- मुंबई मार्गावरुन मार्गस्थ होतील. पुणे ते मुंबई वाहिनीवरील मुंबईकडे येणारी हलकी वाहने व बसेस खोपोली एक्झिट किमी ३९ येथुन वळवून राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ या जुन्या पुणे- मुंबई महामार्गावरुन खोपोली शहरातून पुढे शेंडूग टोल नाका मार्गे मुंबई वाहिनीवरुन मार्गस्थ होणार आहेत.

## नामांकित कंपनीच्या खाद्यपदार्थांच्या आवरणावर खाडाखोड करून विदेशात विक्री, अन्न औषध प्रशासनाची कारवाई



■ नवी मुंबई, विशाल पाटील : नवी मुंबई लगत आलेल्या एमआयडीसी भागातील एका कंपनी मार्फत विदेशात खाद्यमाल पाठवला जातो. मात्र हे करत असताना लिहिण्यात आलेल्या कालमयार्दा खोडण्यात येत होत्या, अशी माहिती समोर येताच नवी मुंबई मनसेच्या सहकार सेनेने ही बाब अन्न आणि औषध प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. सदर प्रशासनाने या कंपनीवर धाड टाकली असता सहकार सेनेने केलेल्या तक्रारीत तथ्य आढळून आले असून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. तुर्भे औद्योगिक वसाहतीमध्ये नामांकित कंपनीचे खाद्यपदार्थ आणि थंडपेय साठवून यावरील माहितीची लेबल बदलवली जात होती. या संपूर्ण कारभाराबाबत शंका असल्याने अन्न व औषध प्रशासनाला याची तक्रार करण्यात आली होती. अन्न व औषध प्रशासनाने या गोदामांची झाडाझडती घेतल्यावर अन्न सुरक्षा मानक कायद्याची पायमल्ली केल्याचे आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी चोवीस लाख रुपये किंमतीची उत्पादने सील करून अधिक तपास सुरू केला आहे. धाड टाकलेल्या एका गोदामात मोठ्या प्रमाणात वेफर्स, कुरकुरे, थंड पेय याचा साठा करून ठेवण्यात आला होता. या साठ्यावर नियार्तीच्या नावाखाली रसायन वापरून उत्पादन तारीख, कालमयार्दा (मॅन्यूफॅक्चर आणि एक्सपायरी) बदलून साठ्यातील उत्पादनांची छापील माहिती रासायनिक पदार्थ वापरत खोडण्यात येत होती. तसेच त्यावर हीच माहिती बदलून पुन्हा टाकण्यात येत होती. हा माल व्यवस्थित पॅकिंग करून विदेशात पाठवला जात होता. सदर प्रकाराबाबत मनसे सहकार सेना उपाध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांनी थेट अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांना तक्रार करून गोदामांची तपासणी करण्यासाठी मागणी केली होती. शनिवारी रात्रभर सुमारे दहा तास या सर्व गोदामांची तपासणी केली. यामध्ये विदेशात ही सर्व उत्पादने पाठवण्यात येणार असल्याने उत्पादनातील माहिती बदलली जात असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. पाहणीदरम्यान अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी विदेशात माल पाठवणे, या ठिकाणी साठवणे, या सारख्या अनेक परवानगीबाबत विचारणा केली असता अशा प्रकारच्या कुठल्याही परवानग्या काढण्यात आल्याची कागदपत्रे संबंधित लोकांना सादर करता आली नाहीत. त्यामुळे कुठलीही परवानगी न घेता हा कारभार सुरु असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

//सुविचार// भूक आहे तेवढे खाणे ही प्रकृती, भूक आहे त्यापेक्षा जास्त खाणे ही विकृती, आणि वेळप्रसंगी स्वतः उपाशी राहून, दुसऱ्याची भूक भागवणे ही संस्कृती.



# जास्वंदीच्या फुलाचे आरोग्यासाठी फायदे



गणपतीला प्रिय असलेले, अतिशय मोहक दिसणारे जास्वंदीचे फूल अनेक रंगांमध्ये बघायला मिळते. लाल, पांढरा. पिवळा, गुलाबी, अशा अनेक रंगांमध्ये हे फूल बघावयास मिळते. या फुलाला हिबिस्कस रोजा सिनेन्सीस असे शास्त्रीय नाव आहे. पण हे फूल केवळ दिसायला सुंदर नाही, तर आरोग्यासाठी ही विशेष गुणकारी आहे. या फुलामध्ये अनेक प्रकारची पोषक तत्त्वे आहेत. या फुलामध्ये 'क' जीवनसत्त्व, कॅल्शियम, फायबर, लोह ही पोषक द्रव्ये मुबलक मात्रेमध्ये असून, अनेक व्याधींच्या औषधोपचारासाठी या फुलाचा उपयोग केला जातो.

जास्वंदीच्या फुलांचा वापर करून बनवलेला काढा आपल्या शरीरातील कॉलेस्टेरोलची मात्रा नियंत्रित ठेवण्यास लाभकारक आहे. यामध्ये असलेली पोषक द्रव्ये हृदयनलिकांमध्ये प्लाकपासून तयार होणारा अवरोध रोखतात. त्यामुळे आपल्या शरीरातील अतिरिक्त कॉलेस्टेरोल कमी होण्यास मदत मिळते. तसेच जास्वंदीची पाने उच्च रक्तदाब असणाऱ्यांसाठी गुणकारी आहेत. जास्वंदीची पाने पाण्यामध्ये घालून ते पाणी उकळून त्याचे सेवन केले असता, हृदयाची जलदगती संथ होण्यास सहाय्य मिळून शारीरिक थकवा दूर होतो. जास्वंदीच्या फुलांचा उपयोग शरीरातील रक्ताच्या कमीकरिता, म्हणजेच ॲनिमियाकरिता करता येतो. शरीरामध्ये लोहाच्या कमीमुळे ॲनिमिया होतो. ही कमी दूर करण्यासाठी चाळीस ते पन्नास जास्वंदीच्या कळ्या वाटून घेऊन त्याचा रस काढून घ्यावा. हा रस एका घट्ट झाकणाच्या बाटलीत भरून ठेवावा. रोज सकाळी एक लहान चमचा जास्वंदीचा रस दुधाबरोबर घ्यावा. या रसाच्या सेवनाने लोहाची कमी दूर होऊन शरीरामध्ये स्फूर्ती वाढते. तसेच जास्वंदीच्या पानांचा काढा काही दिवस ओळीने घेतल्यास किडनी स्टोन विरघळण्यास सहाय्य मिळते.

ज्यांना ऋतुमान बदलते तेव्हा किंवा प्रदूषित हवेमुळे श्वसनासंबंधी रोगांचा त्रास होतो किंवा ज्यांना दमा, थोड्या श्रमांनी धाप लागणे अशा तक्रारी असतात, त्यांनी जास्वंदीची फुले घालून उकळून तयार केलेला काढा साखर न घालता घ्यावा. जास्वंदीमध्ये असलेले 'क' जीवनसत्त्व, क्षार आणि अँटी ऑक्सिडंट्समुळे श्वसनाच्या तक्रारी दूर होतात. तसेच या काढ्याच्या सेवनाने कफ आणि घसादुखीही बरी होते.

# घनदाट केस आणि सुंदर पापण्यांसाठी एरंडेल



तुमची त्वचा आणि केस यांची निगा राखण्यासाठी तुम्ही वापरत असलेल्या सौंदर्य प्रसाधनांमध्ये एरंडेलाचा समावेश करणे उपयुक्त ठरेल. घनदाट, काळेभोर केस, आकर्षक भुवया आणि सुंदर पापण्या कोणाला नको असतील? हे सर्व मिळवण्यासाठी एरंडेलाचा उपयोग होतो. एरंडेल केसांना चमकदार तर बनवतेच, पण त्याशिवाय, एरंडेलाच्या वापराने केसांची चांगली वाढदेखील होते. पण एरंडेल काहीसे दाट असल्याने याचे काहीच थेंब खोबरेल तेलामध्ये मिसळून वापरणेही चांगले.

एरंडेलामध्ये असणारे रीसिनोलिक ॲसिड केसांच्या मुळांशी ph लेव्हल संतुलित ठेवते आणि स्काल्पमधील नैसर्गिक तेलाच्या अंशामध्ये वृद्धी करते. यामुळे डोके कोरडे पडणे, डोक्यात खाज सुटणे, कोंडा होणे असल्या तक्रारी दूर होण्यास मदत मिळते.

आपल्या केसांसाठी आपण जी प्रसाधने वापरत असतो, त्या प्रसाधनांमधील रसायनांमुळे केसांवर विपरीत परिणाम होऊन केस रुक्ष, कोरडे दिसू लागतात. ही समस्या दूर करण्यासाठी एरंडेल थोड्याशा खोबरेल तेलामध्ये किंवा ऑलिव्ह तेलामध्ये मिसळून या तेलाने केसांना मालिश करावी. तासभर हे तेल केसांमध्ये राहू देऊन त्यानंतर नेहमीप्रमाणे एखाद्या सौम्य शॅम्पूने केस धुवून टाकावेत. आठवड्यातून किमान एकदा हे तेल केसांना लावल्यास केस मुलायम, चमकदार आणि दाट होतील.



एरंडेलामध्ये असलेली मुबलक पोषक द्रव्ये आणि फायटोकेमिकल्स भरपूर केसवाढीकरिता मदत करतात. एरंडेलामध्ये प्रथिने आणि फॅटी ॲसिड्स केसांच्या मुळांना पोषण देतात व भुवया, पापण्या चांगल्या वाढण्यास मदत करतात. याकरिता रात्री झोपण्यापूर्वी एक कापसाचा लहान बोळा एरंडेलामध्ये बुडवून भुवयांवर फिरवत एरंडेल लावे.

सकाळी उठल्यावर चेहरा कोमट पाण्याने धुवून टाकावा. पापण्यांना एरंडेल लावण्यासाठी जुन्या मस्कारा ब्रश किंवा टूथब्रशचा वापर करावा. हा उपाय रोज रात्री काही काळासाठी केल्याने भुवयांची व पाण्याची वाढ होताना दिसू लागेल.

# तिळाची कोरडी चटणी

**साहित्य :** पाऊण ते एक वाटी तीळ, १०-१२ लसूण पाकळ्या, ३-४ टीस्पून तिखट, अर्धा चमचा जिरे, मीठ साखर चवीनुसार.

**पाककृती :** तीळ एका पॅनमध्ये मंद आचेवर खरपूस भाजून घ्यावेत आणि गार करत ठेवावेत, लसूण सोलून घ्यावी, एका मिक्सरच्या भांड्यात लाल तिखटपूड, लसूण, जिरे, मीठ आणि साखर हे घेऊन फिरवून घ्यावं. यातच आता तीळ घालून दाणेदार पोताची चटणी वाटून घ्यावी. भांड्यात काढून एकदा हातानी सारखी करून घ्यावी. नंतर हवाबंद डब्यात ठेवावी. मस्त झणझणीत चटणी तेल भाकरी, पिठलं/ भरीत/ भरली वांगी अशांबरोबर सुरेख लागते.



### अधिक टिपा

- **तिखटाचं प्रमाण आवडीनुसार कमी जास्त करता येईल, पण जरा तिखट चटणी जास्त चविष्ट लागते.**
- **हवं असेल तर तिळासोबत लसूण, मीठही भाजता येईल आणि लाल तिखटाऐवजी लाल सुक्या मिरच्या घेऊन त्याही भाजून मग वाटता येईल. अर्थात ही वाली जास्तच खमंग होईल.**

## दिनविशेष

### १३ फेब्रुवारी

- १६३०: आदिलशाही आणि निजामशाही संपवण्याच्या उद्देशाने मुघल बादशहा शहाजहान मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपूर येथे पोहोचला.
- १६६८: स्पेनने पोतुर्गालच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
- १७३९: कर्नालची लढाई झ पर्शियाच्या नादिरशहाने मुघलांच्या मुहम्मदशहावर तीन तासांत विजय मिळवला. या विजयामुळे नादिरशहाचा दिल्लीत येण्याचा मार्ग सुकर झाला.
- १९६०: फ्रांसने पहिली परमाणुबॉम्बची चाचणी केली.
- १९८४: युरी आन्द्रेपॉव्ह यांच्यानंतर कॉन्स्टान्टीन चेरेनेन्को सोविएत संघाचे अध्यक्ष झाले.
- १९८८: कॅनडात कॅल्गारी येथे १५वे हिवाळी ऑलिंपिक खेळ सुरू.
- २००३: चित्रपट निमार्ते, दिग्दर्शक यश चोप्रा यांना दादासाहेब फाळ्के पुरस्कार प्रदान.
- २०१०: पुणे येथे दहशतवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात १७ ठार, ६० जखमी.
- १७६६: प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ थॉमस माल्थस यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर १८३४)
- १८३५: अहमदिया पंथाचे संस्थापक मिर्झा गुलाम अहमद यांचा जन्म. (मृत्यू: २६ मे १९०८)
- १८७९: प्रभावी वक्त्या, कवयित्री व स्वातंत्र्यसेनानी सरोजिनी नायडू यांचा जन्म. (मृत्यू: २ मार्च १९४९)
- १८९४: इतिहासकार वासुदेव सीताराम तथा वा. सी. बेन्द्रे यांचा जन्म. (मृत्यू: १६ जुलै १९८६)
- १९१०: वेदविद्येचे आणि संस्कृतचे गाढे अभ्यासक, वेदांती पंडित दत्तात्रयशास्त्री धुंडिराज तथा दत्तमहाराज कवीश्वर यांचा जन्म. (मृत्यू: १ मार्च १९९९)
- १९११: लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर फैज अहमद फैज यांचा जन्म. (मृत्यू: २० नोव्हेंबर १९८४)
- १९४५: अभिनेता विनोद मेहरा यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑक्टोबर १९९०)
- १८८३: जर्मन संगीतकार, संगीतसंयोजक व दिग्दर्शक रिचर्ड वॅग्नर यांचे निधन. (जन्म: २२ मे १८१३)
- १९०१: गायक नट लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर यांचे निधन. (जन्म: ९ मार्च १८६३)
- १९११: फैज अहमद फैज झ लेनिन शांतता पुरस्कार विजेते ऊर्दू शायर (मृत्यू: २० नोव्हेंबर १९८४)
- १९१६: भारतीय सेनेतील सेवानिवृत्त लेफ्टिनेंट जनरल जगजीत सिंह अरोड़ा यांचा जन्म.
- १९४५: विनोद मेहरा - अभिनेता (मृत्यू: ३० आक्टोबर १९९०)



## बाप


सारे वर्णिती आईची वेडी माया
तरी बाप असे कुटुंबाचा पाया
माया बापाची जणू नारळ खरे
राग जरी वर आत प्रेम झरे
घरासाठी बाप राबे दिनरात
देह झिजे त्याचा जळे जशी वात
ढाल बनुनी बाप उभा दारात
धजे ना कोणी उगा येण्या घरात
माया बापाची असे कस्तुरीपरी
दिसे न वरून जाणावी अंतरी
उलटेल जेव्हा वडिलांची साठी
बना तुम्ही त्यांच्या आधाराची काठी

# किरण रावचा मोठा गौप्यस्फोट

बॉलीवूड स्टार आमिर खान याने दुसरी पत्नी किरण राव हिला घटस्फोट दिला. ऑगस्ट 2021 मध्ये त्यांनी घटस्फोटाची घोषणा केली होती. त्यानंतरही ते दोघे चांगले मित्र आहेत. फॅमिली फंक्शन्समध्ये अनेकदा ते एकत्र दिसले आहेत. आमिर खान आणि त्यांची पहिली पत्नी रिना दत्ता यांची मुलगी इरा खान हिच्या लग्नात अमिर खान आणि किरण राव हे दोघे एकत्र दिसले होते. सध्या किरण राव या आगामी चित्रपट लापता लेडीज याच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहेत. लापता लेडीज ची निर्मिती किरण आणि आमिरने संयुक्तपणे केली आहे. याच दरम्यान किरण राव यांनी आमिर खान याच्याबाबत एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. अमिर खानच्या प्रॉडक्शन हाऊससोबत काम करणे नेहमीच सोपे होते. तो नेहमी दुसऱ्यांच्या मतांचे स्वागत करतो. तो माझ्याकडे एक क्रिएटिव्ह पार्टनर म्हणून पाहतो. ही खूप आनंदाची गोष्ट आहे असे किरण हिने सांगितले. काही दिवसांपूर्वी निमल चे दिग्दर्शक संदीप रेड्डी वंगा यांनी आमिर खान याच्या चित्रपटावर निशाणा साधला. त्यावेळी किरण राव हिने संदीप रेड्डी वंगा यांना उत्तर दिले. आमिरने त्याच्या काही चित्रपटांसाठी आधीच माफी मागितली आहे. त्यांना आमिरच्या कामाबद्दल काही अडचण असेल तर त्यांनी थेट त्याच्याशी बोलावे. आमिर हा काही एकटा त्याच्या चित्रपटांसाठी जबाबदार नाही असे उत्तर किरण राव यांनी दिले होते.



# 'शिवरायांचा छावा'मध्ये राहुल देव साकारणार काकर खान



अनेक हिंदी चित्रपट व मालिकांमध्ये खलनायक म्हणून झळकलेले अभिनेते राहुल देव आता आगामी शिवरायांचा छावा या चित्रपटात काकर खान ही खलनायकी व्यक्तिरेखा साकारणार आहे. शिवरायांचा छावा हा भव्य ऐतिहासिक पट रुपेरी पडद्यावर उलगडणारा ए.ए. फिल्म्स आणि एव्हरेस्ट एंटरटटेंमेंट प्रस्तुत आणि दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित शिवरायांचा छावा १६ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. औरंगजेबाने बुऱ्हाणपूरची पूर्ण जबाबदारी काकर खान या अनुभवी सरदारावर सोपविली होती. लोकांवर जिझिया कर लावत काकर खानने जनतेस वेठीस धरले होते. काकरखानच्या अन्यायी राजवटीपासून छत्रपती संभाजी महाराजांनी रयतेची सुटका केली होती. आपल्या या भूमिकेविषयी बोलताना राहुल देव सांगतात की, ह्याआजवरच्या अभिनय कारकिर्दीत अनेक खलनायकी भूमिका साकारल्या असल्या तरी क्रूरकर्मा काकर खान ही ऐतिहासिक भूमिका करण्यासाठी विशेष मेहनत घेतली आहे. एखादी विशेष भूमिका वठवताना अगदी भाषेपासून चालण्या बोलण्याच्या सवयी पर्यंतचे बदल करावे लागतात. काकरखान खानची भूमिका असल्याने उर्दू भाषा आत्मसात करणं मला गरजेचं होत. प्रत्येक भाषेचा स्वतःचा असा लहेजा असतो, तो लहेजा लक्षात घेत ही भाषा मी शिकून घेतली. भाषेनंतर प्रश्न होता तो लुक्सचा. त्यामुळे देहबोलीही तितकीच बोलकी असण्याची महत्त्वाची जबाबदारी माझ्यावर होती. ती मी माझ्या अभिनयातून केली असल्याचे राहुल सांगतात. मल्हार पिक्चर्स कं.चे वैभव भोर, किशोर पाटकर, मधू यांनी या ऐतिहासिक चित्रपटाची निर्मिती केली आहे. तर सह-निर्मिती भावेश रजनीकांत पंचमतीया यांनी केली आहे. कार्यकारी निमार्ता प्रखर मोदी आहेत.
कथा दिग्पाल लांजेकरांनी लिहिली असून पटकथा-संवाद आणि गाणी देखील त्यांचीच आहेत. गाण्यांना साजेसं संगीत युवा संगीतकार देवदत्त मनीषा बाजी यांनी दिलं आहे. पार्श्वसंगीत अमर मोहिले यांचे आहे. चित्रपटाच्या वितरणाची जबाबदारी ए. ए.फिल्म्स सांभाळत आहे.

## भविष्य

**मेष** आज वाहन खरेदी करणे आपल्यासाठी लाभदायक राहील. जर तुम्ही व्यावसायिक असाल तर तुमच्या व्यवसायात आज काही नवे बदल होतील ज्याचा तुम्हाला फायदाच होईल.

**वृषभ** आज तुम्ही तुमच्या प्रतिभेचं दर्शन करून तुमच्या क्षेत्रात आगेकूच करण्याचा प्रयत्न कराल. आज भाग्य ७३ टक्के तुमच्या सोबत असेल. रोज रात्री उरलेली पोळी काळ्या कुत्र्याला खाऊ घाला.

**मिथुन** कोणा व्यक्तीविषयी तुम्हाला आकर्षण वाटत असेल तर ते एकतर्फी असल्याचं तुम्हाला जाणवेल. आज तुम्हाला काही महत्त्वाचे आर्थिक निर्णय घेण्याची गरज आहे.

**कर्क** प्रेम जीवनात चढ उतार येत राहतील. आज आर्थिक बाबतीत सतर्क राहा आणि देण्या घेण्याच्या व्यवहाराचे हिशेब नीट ठेवा. व्यवसायात चांगला नफा होण्याची शक्यता आहे.

**सिंह** आज कुटुंबाच्या विस्ताराविषयी संवाद साधतील. प्रेमी जोडपी आज एकमेकांसोबत वेळ घालवून आनंदी होतील. आज पैशांची गुंतवणूक करताना सावधानता बाळगा.

**कन्या** आज तुमच्या समर्पण आणि मेहनतीच्या जोरावर तुम्हाला आर्थिक लाभ मिळेल. मालमता किंवा पैशांची देवाणघेवाण करताना खूप सावध राहा. व्यवसायात एखादे आवश्यक काम सहजतेने पूर्ण होईल.

**तुला** प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपकार्मुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

**वृश्चिक** उत्पन्नाचे नवे स्त्रोत शोधण्याचा प्रयत्न करा. व्यावसायिकांना गिऱ्हाईकांच्या फीडबॅकचा विचार करावा लागेल. नोकरदार लोकांनी त्यांचे टार्गेट पूर्ण केल्याने ते सुटकेचा निःश्वास सोडतील.

**धनु** आज मोठा धनलाभ होण्याची देखील शक्यता आहे. तुमच्या चालू प्रोजेक्टमध्ये तुमच्या मेहनतीची प्रशंसा होऊ शकते. नोकरीत मनाजोगती प्रगती होण्याचे योग आहेत.

**मकर** आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

**कुंभ** आज कुंभ राशीच्या लोकांना जरा जपून राहावे लागणार आहे. प्रेम संबंधात असणाऱ्या लोकांसाठी दिवस सामान्य राहील. आज देण्याघेण्याच्या व्यवहारात खूप सावध राहण्याची गरज आहे.

**मीन** आज तुमच्या मनात स्वतःचे काम सोडून दुसऱ्यांना मदत करण्याची भावना जागृत होईल. तुम्ही तुमच्या प्रिय व्यक्तीकडे आपल्या मनातील गोष्ट व्यक्त कराल.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 8 | 7 | | 5 | | | 6 | |
| 9 | | | 4 | | | | | 3 |
| 2 | | 6 | | 8 | 9 | 5 | | |
| | | 4 | | 1 | 5 | 6 | | |
| 1 | | | | | 4 | | 5 | |
| | 7 | 8 | 2 | | | | | |
| | | | | | 8 | | 7 | |
| 7 | 5 | | | | | | 3 | |
| | 2 | | | 3 | 7 | 4 | 1 | |

### उत्तर सुडोकू - ४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3 | 6 | 1 | 7 | 8 | 2 | 5 | 9 |
| 5 | 7 | 8 | 2 | 9 | 6 | 1 | 4 | 3 |
| 9 | 2 | 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 6 | 9 | 3 | 4 | 8 | 1 | 7 | 2 | 5 |
| 7 | 1 | 2 | 5 | 6 | 9 | 3 | 8 | 4 |
| 8 | 4 | 5 | 7 | 2 | 3 | 9 | 1 | 6 |
| 1 | 8 | 9 | 6 | 5 | 7 | 4 | 3 | 2 |
| 2 | 6 | 7 | 8 | 3 | 4 | 5 | 9 | 1 |
| 3 | 5 | 4 | 9 | 1 | 2 | 8 | 6 | 7 |


एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# नेमकं चुकलं कुठे? टीम इंडियाच्या कर्णधारानं सांगितलं कांगारुंविरुद्धच्या पराभवाचं कारण



कांगारूंनी पुन्हा एकदा टीम इंडियाला (ळीं क्ल्ल्रं) रडवलं. ऑसी संघानं मोठ्या शिताफिनं टीम इंडियाच्या धुरंधरांना थोपवत तब्बल चौथ्यांदा वर्ल्डकपवर (व19 हङ्क१ 'ि उ४स्त्र 2024) आपलं नाव कोरलं. अंडर-19 वर्ल्डकप 2024 स्पर्धेचा अंतिम सामना रविवारी टीम इंडिया आणि ऑस्ट्रेलिया (अ४२३१ृ) यांच्यात खेळवण्यात आला. विजेतेपदाच्या लढतीत कांगारूंनी टीम इंडियाचा तब्बल 79 धावांनी पराभव केला. अंतिम फेरीतील पराभवानंतर भारतीय कर्णधार उदय सहारननं (वॅ८ रॅ१ल्ल) आपली चूक उघडपणे मान्य केली आणि पराभवाचं कारणही सांगितलं. अंडर-19 विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात टीम इंडियाला ऑस्ट्रेलियाकडून तब्बल 79 धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. वर्ल्डकपमधील पराभवानंतर भारतीय युवा क्रिकेट संघाचा कर्णधार उदय सहारननं आपली चूक मान्य करत, आपण आपली रणनीती अंमलात आणली नाही आणि खराब शॉट्स खेळण्याचे परिणाम भोगले, असं सांगितलं. ऑसी संघाविरुद्धच्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं सर्वात आधी खेळताना 50 ओव्हर्समध्ये तब्बल सात विकेट्स गमावत 253 धावा काढल्या. ऑस्ट्रेलियाचं आव्हान स्विकारत फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या टीम इंडियाला मात्र कांगारूंनी मोठ्या शिताफीनं थोपवलं. टीम इंडिया 43.5 ओव्हर्समध्ये केवळ 174 धावा करुन ऑलआऊट झाली. टीम इंडियाकडून केवळ सलामीवीर आदर्श सिंह (47) आणि आठव्या क्रमांकाचा फलंदाज मुरुगन अभिषेक (42) यांनी सर्वाधिक धावा केल्या, या दोघांव्यतिरिक्त टीम इंडियाचे इतर सर्व फलंदाज मात्र फारशी खेळी करु शकले नाहीत.

# आधी रितिकाची कमेंट, आता रोहितची पोस्ट! नेहमी पाठिंबा देणाऱ्या बायकोसाठी हिटमॅनची खास पोस्ट



भारताचा कर्णधार रोहित शर्माची पत्नी रितिका सजदेहसुध्दा खूपच प्रसिध्द आहे. अलीकडेच, इंडियन प्रीमियर लीगची सर्वात यशस्वी फ्रेंचाइजी असलेल्या मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक मार्क बाउचर यांचा पॉडकास्ट व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. या व्हिडिओमध्ये त्यांनी रोहित शमार्ला कर्णधारपदावरून हटवून हार्दिक पांड्याला नवा कर्णधार बनवण्याबाबत आपले मत उघडपणे मांडले होते. मात्र, रोहित शमार्ची पत्नी रितिका हिने यावर कमेंट केल्याने हा व्हिडिओ अधिक चर्चेत आला. यानंतर पुन्हा एकदा मुंबई इंडियन्सचे चाहते रोहित शर्माच्या समर्थनार्थ समोर आले आहेत. मुंबई इंडियन्सच्या कोचच्या व्हिडिओवर कमेंट करताना रितिकाने लिहिले की, 'यामधील अनेक गोष्टी पूर्णपणे चुकीच्या आहेत.' या संपूर्ण प्रकरणावरून एक गोष्ट पूर्णपणे स्पष्ट होते की सध्या मुंबई इंडियन्समध्ये काहीतरी नक्कीच बिनसले आहे. संघ बदलाच्या टप्प्यातून जात असला तरी पाच वेळा संघाला चॅम्पियन बनवणाऱ्या रोहित शमार्ला संघाच्या कर्णधारपदावरून हटवण्याच्या अचानक निर्णयामुळे फ्रँचायझीच्या लोकप्रियतेत झपाट्याने घट झाली आहे. आता रोहित शमार्ने त्याच्या इंस्टाग्रामवर एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये तो पत्नीसोबत दिसत आहे. तसेच, त्याने लिहिलेल्या कॅप्शनमुळे अधिक चचेर्ला उधाण आले आहे. रोहितने रितिकासोबतच हा फोटो शेअर करत 'कायम माझ्यासोबत असते' असे कॅप्शन देत पुढे रितिकाला टॅगदेखील केले आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# वड्याचे तेल 'वागळें'वर !

महाराष्ट्रात भाजपची २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर हातातोंडाशी आलेली सत्ता गेली आणि मी पुन्हा येईन, हा दावा सफशेल फोल ठरला. त्यानंतर केंद्रातील आणि राज्यातील भाजप नेत्यांमध्ये काहीही करून आपण गेलेली सत्ता मिळवायला हवी आणि आपली सत्ता ज्यांच्यामुळे गेली त्यांना धडा शिकवायला हवा, अशी भावना पेटून उठली. भाजपला अनपेक्षित असा निर्णय घेऊन उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद मिळवले. त्यानंतर अडीच वर्षे भाजपने केंद्रातील सत्तेचा वापर करून काय काय केले याची जनता साक्षीदार आहे. भाजपने राज्यात सत्ता आणली, पण त्यांनी लोकांच्या मनातील विश्वासार्हता गमावली, हे त्यांनाही पटलेले आहे. त्यामुळे कुठल्याही स्तरावरच्या निवडणुका असल्या तरी त्या घेण्याचे त्यांना धाडस होत नाही. कारण जर पराभव झाला तर आपली मानहानी होईल, अशी त्यांना भीती वाटते. राज्यातील महापालिकांच्या निवडणुका दीर्घ काळ अडकून राहिलेल्या आहेत. खरे तर हा अडथळा दूर करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलणे हे केंद्रातील भाजपच्या सरकारचे काम आहे, पण जोपर्यंत भाजपला अनुकूल वातावरण निर्माण होत नाही तोपर्यंत याविषयी फारशी रुची दाखवली जात नाही. भाजपने विरोधात असलेल्या विशेषतः शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेतील नेत्यांच्या मागे केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा कसा लावला, त्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे कशी बाहेर काढली आणि ते जेव्हा भाजपमध्ये गेले तेव्हा त्यांची चौकशी कशी थांबवली हे सगळी जनता पाहत आहे. त्यात पुन्हा जिथे भाजपने पोटनिवडणुका घेतल्या तिथे यांना फटका बसल्याचे दिसत आहे. भाजपचे नेते पक्षाला पार्टी वुईथ डिफरन्स असे सांगत आलेले आहेत, आम्ही इतर पक्षापेक्षा वेगळे आहोत, असे त्यांचे म्हणणे असते. त्यात पुन्हा राडा संस्कृती हा शब्द तर त्यांच्यासाठी अगदी शिव शिव याच सदरातला आहे. आम्ही विचारांची लढाई विचारांनी देण्यावर विश्वास ठेवतो, असा त्यांचा दावा असतो, असे असताना पुण्यात शुक्रवारी ह्यनिर्भय बनोह्यच्या सभेसाठी जात असताना ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे ज्या कारमधून जात होते, तिच्यावर भाजपच्या संतप्त कार्यकर्त्यांनी शाईफेक केली आणि कारच्या काचा फोडल्या. त्यानंतरही निखिल वागळेयांनी आपले नियोजित भाषण केले. त्यात त्यांचे विचार मांडले. त्यावेळी त्यांनी सत्ताधारी भाजपवर सडकून टीका केली. एखादा पत्रकार राजकीय पक्षावर सातत्याने टीका करत असेल तर त्याचा त्या पक्षाच्या नेत्यांना राग येणे सहाजिकच आहे. तो मनुष्य स्वभाव आहे, पण त्याच्यावर हल्ला करणे याचे समर्थन होऊ शकत नाही. कारण तो लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावरील आघात आहे. पत्रकार आणि राजकीय नेत्यांच्या उडर्णाया शाब्दिक चकमकी या काही नवीन नाहीत. जेव्हा पत्रकार नेत्यांना गैरसोयीचे प्रश्न विचारतात तेव्हा नेत्यांचा आवाज चढतो. वागळे गेली अनेक वर्षे भाजपवर टीका करताना दिसत आहेत. अलीकडे ते समाज माध्यमांवरून भाजपवर टीका करत असतात, पण आजवर भाजपने कधीही त्यांच्यावर अशा प्रकारचा हल्ला केलेला नव्हता. यापूर्वी त्यांच्यावर हल्ले झाले ते अन्य पक्षाकडून झाले आहेत. त्यामुळेच भाजपच्या त्यातही पुन्हा महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी इतके आक्रमक होण्यामागे काही तरी आत खदखदणारे कारण असावे. शेवटी मुख्य नेत्यांच्या भावनाच आपल्या कृतीतून कार्यकर्ते व्यक्त करत असतात. कारण एखादा ज्येष्ठ पत्रकार गाडीत असताना काचा फोडणे हे काही सहज होणारे कृत्य नाही. त्यामुळे भाजपच्या नेत्यांना एखाद्या पत्रकाराची आजवर वाटली नाही, ती चिंता आता वाटण्याचे तसे कारण नाही. भाजपची २०१९ साली गेलेली सत्ता त्यांनी पुन्हा मिळवली. त्यासाठी त्यांनी शिवसेनेतील नेते एकनाथ शिंदे यांना आपल्याकडे वळवून महाराष्ट्रात ज्याचा वापर झाला नाही, असा फॉर्म्युला वापरला. पूर्वी एखादा नेता पक्षातून बाहेर पडून दुर्सया पक्षात सहभागी होत असे किंवा आपली वेगळी संघटना किंवा वेगळा पक्ष स्थापन करत असे. पण शिंदे यांनी शिवसेनेतून बाहेर न पडता संख्याबळ आपल्याकडे असल्याचे सांगून आपल्या नेतृत्वाखाली आहे तीच खरी शिवसेना असा दावा केला. पुढे तशी मान्यता मिळवून घेतली. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना पक्षाचे मूळ नाव आणि चिन्ह गमवावे लागले. पुढे अजित पवार यांच्याबाबतीतही तसेच झाले. भाजपच्या सोबत एकनाथ शिंदे आले असले तरी त्यांनी आपला पक्ष भाजपमध्ये विलीन केलेला नाही. उद्धव ठाकरे यांना निष्प्रभ करण्यासाठी भाजपने शिवसेना भाजपसोबत आणली, पण भाजपला जे मुख्यमंत्रीपद मिळवायचे होते, ते मिळवता आले नाही. केंद्रातून सूत्रे फिरली आणि मुख्यमंत्रीपदाची माळ एकनाथ शिंदे यांच्या गळ्यात पडली. त्यामुळे राज्यातील भाजप नेते नाराज झाले. काळजावर दगड ठेवून ती भावना चंद्रकांत पाटील यांनी बोलून दाखवली होती. आता लोकसभा असो नाही तर विधानसभा निवडणूक असो. भाजपसोबत तिकीट वाटपात दोन मजबूत भागीदार आहेत. त्यामुळे भाजपच्या नेत्यांना पुन्हा त्याग करावा लागणार आहे. पण त्या नेत्यांची अवस्था सोसवत नाही आणि सांगताही येत नाही, अशी झालेली आहे. वागळेंवरील हल्ला हा वड्याचे तेल वांग्यावर अशाच प्रकारातला वाटण्यास जागा आहे.

यंदाचे वर्ष हे जगातील निवडणुकांचे वर्ष आहे. भारत, अमेरिकेसह ६४ देशांमध्ये निवडणूक होणार आहे. त्यात विश्वासार्ह संसदीय लोकशाही नांदणारे भारतासारखे देश आहेत; तसेच लोकशाहीचा बुरखा पांघरणारेही देश आहेत. या मोसमात पाकिस्तानच्या निकालांनी महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. तेथे नॅशनल असेंब्ली च्या निवडणुकांचे निकाल हाती आले; याचा अर्थ संसदीय लोकशाही निर्धास्त झाली, असे नाही. उलट, मतदारांनी स्पष्ट निकाल न दिल्याने आणि लष्कराची खप्पामर्जी झालेल्या इम्रान खान यांच्या समर्थकांनी बाजी मारल्याने लोकशाहीच्या डोक्यावर नवी टांगती तलवार आली आहे. पाकिस्तानच्या नॅशनल असेंब्ली म्हणजे संसदेत ३४२ जागा असतात. त्यातल्या २६६ जागांसाठी मतदान होते. उरलेल्या महिला व अल्पसंख्याक यांच्यासाठी राखीव ७६ जागा विजयी पक्षांच्या खासदारांच्या प्रमाणात वाटल्या जातात. या निकालाची मेख इथेच आहे.

# 'वर्दी'च्या पाठीत बॅट!



इम्रान यांच्या पाकिस्तान तहरिक ए इस्लाम म्हणजे पीटीआय या पक्षावर बंदी घालण्यात आली. इम्रान यांना तुरुंगात टाकण्यात आले. तरीही इम्रान यांच्या निदान ९३ समर्थक अपक्ष उमेदवारांनी निवडणूक जिंकली आहे. ही लष्कराला तरुण मतदारांनी दिलेली सणसणीत चपराक आहे. मात्र, लोकभावनांचा आदर करायचा नाही, ही त्या लष्कराची रीतच आहे. त्यामुळे, नॅशनल असेंब्लीतील ७६ जागा नवाझ शरीफ यांच्या पाकिस्तान मुस्लिम लीग आणि बिलावल भुत्तो यांच्या पाकिस्तान पीपल्स पार्टीने प्रमाणात वाटून घेतल्या आणि इम्रान यांना पुन्हा सत्तेबाहेर ठेवले, तर नवल नाही. इम्रान हे दूरदृष्टी असणारे किंवा भारताशी प्रेमाचे संबंध ठेवू इच्छिणारे नेते आहेत, असे नाही. उलट, ते एखाद्या मुल्लामौलवीसारखी कट्टर इस्लामी मांडणी करू लागले आहेत. तरीही, तरुणाई त्यांच्या मागे आहे. पाकिस्तानमध्ये ४० ते ४२ टक्क्यांच्या आसपास मतदान होतानाही अनेकदा मारामार असते. या वेळी बहुतेक भागांमध्ये ७० टक्के मतदान झाले. पाकिस्तान आपल्यापेक्षाही तरुण देश आहे. इम्रान यांच्या मागे उभे राहणारे सगळे नवतरुण आहेत. त्यात शिकलेले; तसेच अशिक्षितही आहेत. इम्रान यांच्या पक्षाचे क्रिकेटची बॅट हे चिन्ह उमेदवारांना मिळू शकले नाही, तरी बल्ला, बल्ला, बल्ला... या गर्जनांनी सारा देश दुमदुमून गेला. आजही जातो आहे. या लोकभावनांचा आदर करायचा की नाही, हे लष्कराला ठरवावे लागेल. लष्कराचा तसा विचार दिसत नाही. नवाझ शरीफ, बिलावल भुत्तो, अपक्ष आणि इम्रान यांचे फुटीर समर्थक यांची गठडी वळून नवे केंद्रीय सरकार लष्कर बनवेल, असे दिसते. पाकिस्तानी लष्कर हे जगातील सहाव्या क्रमांकाचे लष्कर आहे. आपल्याशी जमवून न घेणारा पंतप्रधान लष्कर आणि आयएसआय यांना कधीही आवडत नाही. लष्कराने याच इम्रान यांना वापरून शरीफ यांची सत्ता घालवली होती. आता फासे उलटे झाले आहेत. मात्र, यात सामान्य पाकिस्तानी नागरिकांच्या मताला किंवा आवाजाला काहीही किंमत नाही. त्यामुळेच, विक्रमी मतदान होऊनही ही निवडणूक हा फार्स ठरू शकतो. अलीकडच्या वर्षांमध्ये लाखो नागरिकांनी लष्कराच्या विरोधात रस्त्यावर येऊन जी निदर्शने केली, तिच्या मागे इम्रान यांच्या लढाऊ वृत्तीचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी काढलेला नॅशनल मार्च अजूनही सर्वांच्या स्मरणात आहे. या निकालांनंतर पुन्हा इम्रानसमर्थक निदर्शने करीत आहेत. ही आग देशभर पसरली, तर त्यांच्यावर रणगाडे घालायचे का, हा विचार लष्कराला करावा लागेल. ह्ये जो दहशतगर्दी है, इसके पीछे वर्दी है... ही घोषणा लष्करी वाहनांसमोर द्यायला आता लहान मुलेही कचरत नाहीत. हेही श्रेय इम्रान यांचे आहे. आपल्या हिंस्र दहशतीचा पोलादी पंजा गरीब, निःशस्त्र नागरिकांच्या गळ्याभोवती किती आवळायचा, हे आता लष्कराला ठरवावे लागेल. लोकशाही मानणाऱ्या पक्षांनी आघाडी सरकार बनवावे, असे अलीकडेच मायदेशी परतलेले नवाझ शरीफ यांनी निकालांनंतर म्हटले आहे. लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी ही सूचना उचलून धरली आहे. हा अपक्ष व इम्रानसमर्थक खासदारांना इशारा आहे. इम्रान खान व त्यांच्या समर्थकांना वगळून उद्या सरकार बनलेच, तर ते कितपत स्थिर असेल आणि देशात शांतता नांदेल का, हा मोठा प्रश्न आहे. अफगाणिस्तान, आखाती देश आणि भारत यांच्याही या सत्तानाट्यात प्रकट-अप्रकट भूमिका असतात. शरीफ-भुत्तो सरकार हे भारताच्या अधिक हिताचे ठरू शकते. सिंध प्रांताचे लंडनवासी बंडखोर नेते अल्ताफ हुसेन यांचा मुत्तहिदा कौमी मूव्हमेंट-एमक्यूएम पक्ष कुणाच्या मागे उभा राहतो, यातून भारताच्या सहानुभूतीचा अंदाज करता येतो. या पक्षाने शरीफ बंधूंशी चर्चा चालू केली आहे.

# अशोक चव्हाण यांना ब्लॅकमेलिंग करून भाजपने फोडले पण गद्दारांना जनता थारा देणार नाही : यशोमती ठाकूर



■ **अमरावती। प्रतिनिधी,**

काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी मंत्री अँड. यशोमती ठाकूर यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना चव्हाण यांच्यासारख्या नेत्याला ब्लॅकमेलिंग करून भाजपने फोडले आहे. मात्र भाजपने कितीही प्रयत्न केले, दबाव टाकून नेत्यांना ओढण्याचा प्रयत्न केला तरी महाराष्ट्रातील जनता मात्र भाजप आणि अशा गद्दार प्रवृत्तीच्या नेत्यांना निश्चितच थारा देणार नाही, असा दावा यशोमती ठाकूर यांनी केला आहे.

केंद्र सरकारने नुकताच प्रसिद्ध केलेल्या श्वेतपत्रिकेमध्ये काँग्रेसचे नेते अशोक चव्हाण यांचे नाव आल्यानंतर त्यांनी दिलेला हा राजीनामा कशाचे लक्षण आहे हे स्पष्ट होते. अशोक चव्हाण यांच्यावर गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने दबाव होताच, मात्र अखेरीस त्यांना अशा पद्धतीने ब्लॅकमेल करून राजीनामा द्यायला भाग पाडले आहे. स्वतःच्या पक्षाची ताकद आणि प्रतिमा दोन्ही उतरणीला लागल्यामुळे भारतीय जनता पक्ष अशा पद्धतीचे डाव खेळत आहे. काही समस्यांमध्ये अथवा प्रकरणांमध्ये अडकलेल्या काही आदर्श नेत्यांना भारतीय जनता पार्टी निश्चितच आपल्याकडे दबाव टाकून ईडी, सीबीआय या यंत्रणांची भीती दाखवून पक्षात घेऊ शकते, असं ठाकूर म्हणाल्या.

यशोमती ठाकूर पुढे म्हणाल्या की, मात्र तमाम जनता जनार्दनाला ही बाब निश्चितच रुचणारी नाही.

अत्यंत विकृत पद्धतीच्या या राजकारणाचा शेवट येत्या निवडणुकीत सुज्ञ मतदारांकडून निश्चितच केला जाईल याची, आम्हाला खात्री आहे. यापूर्वीही मुघल सेना प्रचंड फौज फाटा आणि दारूगोळा घेऊन इथल्या मावळ्यांवर चाल करून आली होती. आमिष दाखवून आणि भीती दाखवून इथल्या काही मनसबदाराना आणि वतनदारांना मुघलांनी आपल्या बाजूने करून घेतले होते. देशासाठी, स्वराज्यासाठी लढणाऱ्या , मातीशी इमान बाळगलेल्या, संख्येने कमी असलेल्या मावळ्यांचा विजय छत्रपती शिवरायांच्या नेतृत्वाखाली झाला हे महाराष्ट्र विसरलेला नाही.

आगामी निवडणुकीत हे विसरणारही नाही. विकृत राजकारणाला आणि गद्दार युतींना महाराष्ट्र कधीही माफ करणार नाही जनता थारा देणार नाही, असेही अँड. ठाकूर म्हणाल्या.

# Man, his underage son booked after ATR hits camel at Alibaug beach in Raigad



**Alibaug:** A man and his underage son were booked in connection with a collision between an all-terrain vehicle (ATR) and a camel at Alibaug beach in Raigad Maharashtra: Man, his underage son booked after ATR hits camel at Alibaug beach in Raigad A man and his underage son have been booked in connection with a collision between an all-terrain vehicle (ATR) and a camel at Alibaug beach in Raigad district of Maharashtra, a police official said on Thursday, reported the PTI. "The ATV rider was underage. We have booked him and his father under Indian Penal Code and Wildlife Protection Act. The ATV was not registered with the tourism department and it was at high speed when the collision took place," Inspector Sanjay Bangar of Alibag police station said, as per the PTI. Meanwhile, in an another incident, the Thane Police registered an FIR against four persons on Thursday, a day after more than 100 students of a private ashram school in Maharashtra's Thane district suffered from food poisoning after consuming the mid-day meal, an official said, the PTI reported. A total of 117 students, including 48 girls, were admitted to the Shahapur sub-district hospital after they suffered from food poisoning on Wednesday, Shahapur tehsildar Komal Thakur told PTI. The Sant Gadge Maharaj Primary and Secondary Ashram School (residential school for tribal children), where the incident took place, is located at Bhatsai in Shahapur taluka on the outskirts of Mumbai.

# सिंहगडाच्या मार्गावर दारुच्या बाटल्यांचा खर्च; प्रशासनाच्या लक्षात आणून देण्यासाठी दुर्गप्रेमींचा प्रयत्न

■**पुणे। प्रतिनिधी,**

हौशी गडप्रेमींनी सिंहगडावर राबविलेल्या स्वच्छता मोहिमेत घाट रस्त्यावर शेकोटी आणि दारूच्या बाटल्या सापडल्या आहेत. सिंहगडासारख्या वर्दळीच्या गडाच्या रस्त्यावर दारूपाट्र्या सुरू असताना प्रशासनाच्या ही बाब लक्षात कशी आली नाही, असा प्रश्न दुर्गप्रेमींनी उपस्थित केला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अवघ्या आठवड्यावर आल्याने दुर्गप्रेमींकडून वेगवेगळ्या किल्ल्यांची स्वच्छता केली जाते आहे. यांपैकी एक ट्रॅश टॉक या ग्रुपने दोन दिवसांपूर्वी शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या सहभागातून सिंहगडावर स्वच्छता मोहीम राबविली. तानाजी कड्यापासून ते घाट मार्गावर फिरून त्यांनी प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थांच्या पिशव्यांसह इतर कचरा गोळा केला. ट्रॅश टॉक ग्रुपचे प्रमुख केदार पाटणकर म्हणाले, ह्यस्वच्छता मोहिमेदरम्यान आम्हाला मुख्य रस्त्याच्या कडेला काही ठिकाणी शेकोट्या आणि शेजारी दारूच्या बाटल्या आढळल्या. एरवी सायंकाळी सहानंतर गड पर्यटकांसाठी बंद होतो. कोंढणपूरचे मुख्य गेट बंद केल्यानंतर रात्री पर्यटकांना गडावर जाता येत नाही, असे प्रशासनाकडून सांगितले जाते. मग घाट रस्त्यावर रात्री शेकोट्या पेटवल्या जातात, दारूपाट्र्या कशा होतात, हे आम्हाला समजले नाही.

# पुण्यात घोंगावतंय डासांचं वादळ, सायंकाळी घराबाहेर पडणंही मुश्कील, पुणेकर हैराण

■**पुणे। प्रतिनिधी,**

गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील खराडी भागात डासांनी अक्षरशः उच्छाद मांडला आहे. पुण्यातील खराडी परिसरातील केशवनगरच्या नदीपात्रात डासांचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे येथील रहिवाशांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे.

पुण्यातील मुळा-मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात साठलेल्या जलपर्णी तसेच या वाढलेल्या जलपर्णींमुळे या परिसरात डास, मच्छर, कीटक आणि माश्यांचे प्रमाण वाढल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या डासांमुळे मोठ्या प्रमाणावर येथील स्थानिक नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. महानगरपालिका प्रशासनाने यावर लवकरात लवकर उपाययोजना करावी अशी मागणी स्थानिक नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे. पुण्यात वाहणा[illegible]या मुळा-मुठा नदीपत्रात वाढलेलं प्रदूषण आणि जलपर्णी यामुळे डासांचं प्रमाण वाढलं आहे. स्थानिक नागरिक गेल्या अनेक महिन्यांपासून ही जलपर्णी काढण्यासाठी महापालिकेकडे पाठपुरावा करत आहेत. मात्र, महापालिकेने सपशेल दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावरच बेतलं आहे. वास्तविक पाहता मुळा-मुठा सुधार प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. एका आंतरराष्ट्रीय कंपनीला नदी सुधार प्रकल्पाचे काम देण्यात आले आहे. मात्र, कित्येक वर्षांपासून रखडलेल्या या कामाचा फटका आता थेट



नागरिकांना बसत आहे.

पुण्यातील नामांकित वकिलांसोबत शांत डोक्याने प्लॅन; डोळ्यांदेखत 'रेकी' करुन साथीदारांनी मोहोळचा काटा काढला या भागात राहणारे स्थानिक नागरिक गणेश ढाकणे यांनी याबद्दल अधिक सांगितलं. डासांचा त्रास इतका आहे की सायंकाळी सहानंतर नागरिकांना घराच्या बाहेर देखील पडता येत नाही. खराडी परिसरातील नदीच्या बाजूला एक शाळा आहे.

# Crane wire snaps, kills three labourers in Nashik

Mumbai: **Three labo**urers employed for silt removal work were killed when the wire rope of a crane they were using broke, causing them to plunge into a well in Maharashtra's Nashik Three labourers employed for silt removal work were killed when the wire rope of a crane they were using broke, causing them to plunge into a well in Maharashtra's Nashik. The tragic incident unfolded in Mulane village of Satana taluka around 4 pm on Sunday, police said. The labourers were coming out for lunch break when the wire rope of the crane snapped, causing them to fall into the 50-feet deep well, the official said. The trio sustained injuries, and during the second attempt to bring them out by crane, the rope snapped again, he said. The men died by the time the locals managed to get them out of the well, the official added. The deceased have been identified as Ganesh Tulshiram Nadekar (26), Nitin Ramdas Ahire (27) and Ganesh Vinayak Nadekar (28), he said. Meanwhile, six people of a family were killed after their car went out of control and fell into a drain here on Monday, police said. The incident happened in the early hours of the day near Jagannathpur village in Kanpur Dehat district when the family was returning from Madhya Pradesh after attending a 'tilak ceremony', they said. Virat (15) and Vaishnavi (19), who were among the eight people travelling in the ill-fated vehicle, were saved by police, Superintendent of Police (Kanpur Dehat) BBGTS Murthy said.

# शाळेच्या छतावर मृत अर्भक, मांसाचे तुकडे आढळले



■**अकोला । प्रतिनिधी,**

शहरातील रतनलाल प्लॉट चौकातील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेच्या छतावर एक नवजात मृत अर्भक व मांसाचे तुकडे आढळल्याने खळबळ उडाली. रविवारी दुपारी मुले क्रिकेट खेळत असतांना हा प्रकार समोर आला. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. शहरातील रतनलाल प्लॉट स्थित जिल्हा परिषदेची बंद पडलेली उर्दू माध्यमिक शाळेची इमारत आहे. या शाळेच्या परिसरात काही मुले क्रिकेट खेळत होती. चेंडू इमारतीच्या छतावर गेल्याने तो काढण्यासाठी मुले देखील गेली. इमारतीवर नवजात अर्भक मृतावस्थेत दिसून आल्याने मुले घाबरली. त्यांनी परिसरातील नागरिकांना सांगितले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.अकोला शहर उपविभागीय पोलीस अधिकारी कुळकर्णी, स्थानिक गुन्हे शाखा व सिव्हिल लाईन पोलीस घटनास्थळी दाखल झाले. चार ते पाच महिन्याचे हे अर्भक असल्याची प्राथमिक माहिती आहे. सोबतच प्लास्टिकच्या पिशवीमध्ये मांसाचे तुकडे देखील दिसून आले. पोलिसांनी पंचनामा करत अर्भक ताब्यात घेतले. ते तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# Man held for making hoax bomb call to police control room



**Nagpur:** A man was arrested on Sunday over a hoax bomb call to a police control room, allegedly claiming that explosives had been placed at a bank in Nagpur, officers said, reported news agency ANI. The control room of Nagpur Police received a phone call from a person who identified himself as Venkatesh Rajan, the officers said, claiming that several explosives had been planted in the Govandi area and would go off any time, reported ANI. "On February 10, late at night, a person called the police control room, claiming that bombs had been planted at the Bank of Maharashtra at Deonar Colony, Govandi," an official said, reported ANI.

A police team was rushed to the spot on receipt of the hoax bomb call, the officers said, adding that they inspected the area but found nothing, reported ANI. The police said further inquiry revealed that the person made the phone call under the influence of alcohol.

The call was later deemed a hoax, the officers added. "When the police traced the caller's number and made further inquiries, it was found that the person made the call under the influence of alcohol. A case was registered in the matter and the caller was apprehended by Govandi police on February 11," the officer added, reported ANI. Further investigation is underway. Earlier in December, Mumbai Police's Crime Branch has arrested three persons from Vadodara in Gujarat, in connection with a threat directed at the Reserve Bank of India (RBI) regarding potential bomb blasts at various locations in Mumbai, reported PTI. During the ongoing investigation, authorities revealed that the accused individuals orchestrated the threat mail with the intention of creating mischief, news agency PTI reported quoting officials of Mumbai Police. The threat email, sent to the RBI, claimed that 11 bombs had been strategically placed at different locations in the city, including prominent sites such as the RBI's new office building, HDFC House in Churchgate, and the ICICI Tower in Bandra Kurla Complex, reported PTI. Subsequently, a First Information Report (FIR) was registered at the Mata Ramabai Ambedkar (MRA) Marg police station in South Mumbai against an unidentified person. The Mumbai Police's crime branch was then tasked to conduct a thorough investigation into the matter.

# मनसेचे शहर अध्यक्ष गजानन काळे यांच्या विरोधात गुन्हा दाखल



**■नवी मुंबई । प्रतिनिधी,**
नवी मुंबईतील सिवूड्स येथे मनपाच्या स्थापत्य विभागाच्या कामाच्या आढाव्यादरम्यान कनिष्ठ अभियंत्याला अर्वाच्च शिवीगाळ करणे, अरेरावीचे बोलणे मनसे अध्यक्ष गजानन काळे यांच्या अंगलट आले आहे. त्यांच्या विरोधात एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

७ तारखेला नवी मुंबई मनसे अध्यक्ष गजानन काळे यांनी सिवूड्स परिसरात रस्ते काम पाहणी दौरा आयोजित केला होता. यावेळी रस्त्यावर काम नियमांना धरून केले जात नाही, धूळ मोठ्या प्रमाणावर होत आहे, प्रदूषण नियंत्रण नियमांची पायमल्ली होत आहे, कामाचा दर्जा चांगला नाही असे अनेक आरोप काळे यांनी केले. मात्र या दरम्यान त्यांनी कनिष्ठ अभियंता व कंत्राटदार कामगार यांना अर्वाच्च भाषेत बोलून शिवीगाळ केली होती. याची दखल घेत कार्यकारी अभियंता संजय पाटील यांनी गजानन काळे यांच्या विरोधात दिलेल्या तक्रारीवरून एनआरआय पोलिसांनी काळे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

७ तारखेला काळे यांनी पाहणी दौऱ्यादरम्यान जी शिवीगाळ केली त्या विरोधात दुसऱ्या दिवशी यांच्या कार्यालयावर स्व. दि बा पाटील ठेकेदार संघटनेने आंदोलन केले होते. त्यावेळी काळे यांनी झालेल्या प्रकरविरोधात दिलगिरी व्यक्त केली होती. वास्तविक त्याच ठिकाणी वाद मिटला होता. मात्र त्याच दिवशी दुपारनंतर काळे यांनी शहर अभियंता संजय देसाई यांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले. कंत्राटदारांच्या तक्रारींचा पाढा वाढला. त्यामुळे प्रकरण जास्त चिघळले. त्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणून ९ तारखेला मनपा कर्मचारी संघटनेने काळे यांच्या या कृतीचा निषेध म्हणून काळ्या फिती लावून काम केले.

दादागिरी झुंडशाही नाही चालणार अशी प्रतिक्रिया कर्मचाऱ्यांनी दिल्या. कर्मचाऱ्यांच्या भावना लक्षात घेत कार्यकारी अभियंता संजय पाटील यांनी एनआरआय पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. गजानन काळे आणि अमोल आयवळे यांच्या विरोधात गुन्हा नोंद केला आहे.

# डोंबिवलीत ओला चालकाला प्रवाशाची मारहाण




**■डोंबिवली। प्रतिनिधी,**
भाडे देण्याच्या वादातून रविवारी रात्री येथील एमआयडीसीतील विको नाका भागात एका ओला कार चालकाला एका प्रवाशाने बेदम मारहाण केली. या मारहाणीत चालकाला गंभीर दुखापत झाली आहे. सुनीलकुमार राजदेव यादेव (४५) असे ओला कार चालकाचे नाव आहे. तो दावडी गावात राहतो. रफिक शेख असे प्रवाशाचे नाव आहे. तो सोनारपाडा भागात राहतो.

पोलिसांनी सांगितले, सुनीलकुमार प्रवासी वाहतूक करणाऱ्या ओला कंपनीत चालक म्हणून काम करतात. रविवारी रात्री पावणेबारा वाजता प्रवासी रफिक शेख यांनी ऑनलाईन माध्यमातून सुनीलकुमार यांची कार प्रवासासाठी नोंदणीकृत केली.

वाशी, नवी मुंबई, वाशी बाजार समिती ते सोनारपाडा असा प्रवासाचा मार्ग होता. विहित वेळेत ओला कार चालकाने प्रवासी रफिक यांना डोंबिवली एमआयडीसीतील विको नाका भागात सोडले. प्रवास संपल्यानंतर भाड्याचा विषय आला. त्यावेळी प्रवासी रफिक यांनी चालकाबरोबर वाद घातला. या वादातून रफिकने हातमधील टणक वस्तूचा फटका चालक सुनीलकुमार यांच्या चेहऱ्यावर मारला. या मारहाणीत ते जखमी झाले. घडल्या घटनेची चालक सुनीलकुमार यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली.

पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. पोलीस उपनिरीक्षक के. पी. गांगुर्डे तपास करत आहेत.

# एअर गनने दहशत माजविल्याप्रकरणी गुन्हा दाखल, ॲमेझॉन कंपनीच्या संकेतस्थळावरून विकत घेतली होती गन



**■ठाणे। प्रतिनिधी,**
भिवंडी येथील ठाणगेआळी भागात एअर गनने (बनावट बंदूक) परिसरात दहशत माजविल्याप्रकरणी निजामपूरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी तुषार खारेकर (२४), कृष्णा चव्हाण (२९) आणि विशाल भोईर (२८) या तिघांना ठाणे पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी या टोळीतील एकाकडून एअरगन जप्त केली आहे.

ही एअरगन ॲमेझॉन या संकेतस्थळावरून खरेदी केल्याची माहिती पोलिसांनी दिली. ठाणगेआळी भागात दोन गटांमध्ये शनिवारी वाद झाले होते. या वादातून दोन्ही गटाने निजामपूरा पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी तक्रारी दाखल केल्या. या तक्रारींच्या आधारे दोन्ही गटांविरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. दरम्यान, शनिवारी सायंकाळी पोलिसांकडे एक चित्रीकरण प्राप्त झाले. या चित्रीकरणामध्ये तक्रार देणाऱ्या गटातील एका व्यक्तीच्या हातामध्ये पिस्तुल दिसत होती. तसेच तो नागरिकांमध्ये दहशत निर्माण करत होता. उल्हासनगर येथील गोळीबार प्रकरणानंतर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. पुन्हा अशाप्रकारचे चित्रीकरण प्रसारित होऊ लागल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, भिवंडी परिमंडळाचे उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांनी तत्काळ याप्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले. निजामपुरा पोलिसांनी परिसरात चौकशी केली असता, तुषार खारेकर, कृष्णा चव्हाण आणि विशाल भोईर यांची नावे समोर आली. पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले.

त्यावेळी कृष्णा याच्याकडे पिस्तुलच्या बनावटीची एअरगन आढळून आली. ही एअरगन मिखंज पटेल याची असून त्याने ती ॲमेझॉन कंपनीच्या संकेतस्थळावरून विकत घेतल्याचे समोर आले. पोलीस मिखंज पटेल याच्यासह त्याच्या साथीदारांचा शोध घेत आहेत.

# पत्नीवर ॲसीड हल्ला, पनवेल तालुक्यातील घटना



**■पनवेल। प्रतिनिधी,**
हैद्राबादला न येणाऱ्या पत्नीवर ॲसीड हल्ला केल्याची घटना पनवेल तालुक्यातील खैरणे गावात घडली आहे. २० जानेवारीला तळोजा येथील खैरणे गावात ही घटना घडली असून याबाबतचा रितसर गुन्हा दोन दिवसांपूर्वी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे. ॲसीड फेकणारा २८ वर्षीय पती अद्याप पोलिसांच्या हाती सापडला नसला तरी पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

पश्चिम बंगाल येथील मूळ निवासी असणारे रमजान गाझी आणि अमिना खातून हे दाम्पत्य खैरणे गावातील प्लॉट नंबर १७ रिझवान कंपनीशेजारी भाड्याने राहत होते. रमजाण हा बांधकामात मोलमजूरी करायचा तर अमिना ही कंपनीत कंत्राटी कामाला जात असे. या दोघांनाही तीन मुले आहेत. मागील काही दिवसांपासून रमजान याने पत्नी अमिनाकडे येथे राहण्याऐवजी हैद्राबादला जेथे बहीण राहते तिकडेच काम पाहू आणि तिकडेच राहण्याचा हट्ट केला. अमिनाचा हैद्राबादला जाण्यास विरोध होता. त्यामुळे काही दिवसांपासून या दोघांमध्ये किरकोळ वाद सुरु झाले. १९ जानेवारीला रात्री असेच भांडण झाले होते. मात्र पहाटे दोन वाजता अमिना व मुले झोपली असताना रमजाण हा ॲसीड घेऊन घरी आला. मुले झोपली असताना अमिनाला उठवून त्याने तीच्या चेहऱ्यावर ॲसीड फेकून तिला जखमी केले.

अमिनाने अंगावर पांघरुण घेतल्याने ॲसीड फेकल्यानंतर ते ॲसीड तीच्या चेहऱ्यावर थोडेच उडाले. मात्र तीचा चेहरा २० टक्यांपेक्षा अधिक भाजला. जखमी अवस्थेमधील अमिनाला शेजारच्यांनी मदत केली. तीला तातडीने औषधाच्या दूकानातून आणलेले मलम लावल्यानंतर तीने येथे न राहण्याचा निर्णय घेतला आणि गाव गाठण्यासाठी थेट रेल्वेस्थानक गाठले. सध्या तीच्यावर कोलकाता येथील एनसीएमसी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

त्या परिसरातील बनियापुकुर या स्थानिक पोलिसांनी संबंधित घटनेचा गुन्हा नोंदविल्यानंतर हा गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्याकडे वर्ग केला. १० फेब्रुवारीला याबाबतचा रितसर गुन्हा वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांनी नोंदविल्यानंतर सहाय्यक पोलीस निरिक्षक अर्चना कुदळे यांच्याकडे हे गंभीर प्रकरण सोपविले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक कुदळे यांनी फरार रमजाणचा शोध सुरु करुन अमिनाच्या अंगावर हल्ला झाला त्यावेळचे त्यांच्या घरातील कपडे या प्रकरणात जप्त केल्याचे लोकसत्ताला सांगितले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून रमजाणच्या शोधासाठी स्वतंत्र एक पथक नेमण्यात आले आहे.

रमजाणने अतिघातक क्षमतेचे असलेले ॲसीड कसे मिळवले याचा शोध घेत आहेत. रमजान हा पश्चिम बंगालमधील बासंती तालुक्यातील शिमुलतुल्ला गावात राहणारा होता. २०२१ मध्ये नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात ॲसीड हल्ला झाला होता. त्यानंतरची ही दूसरी घटना आहे.

# महिला पोलिसाच्या दागिन्यांवर डल्ला

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**
नवी मुंबई पोलिस दलातील एका महिला कर्मचाऱ्याचे घर फोडून सव्वा चार लाखांचे दागिने चोरल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एनआरआय पोलिस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल आहे.

उलवे परिसरात राहणाऱ्या महिला पोलिस कर्मचाऱ्याने स्वतःचे दागिने घरातील लोखंडी कपाटात काढून ठेवले होते. ३ फेब्रुवारी रोजी मुलाच्या शाळेत कार्यक्रम असल्याने कपाटातील सोन्याचा हार, तसेच कर्णफुले पाहिली असता सापडली नाहीत. त्यामुळे या महिलेने घरातील दागिन्यांचा शोध घेतला. मात्र, दागिने सापडले नाहीत. घरातील सुमारे सव्वा चार लाखांचे दागिने चोरल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी एनआरआय पोलिस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे.

# पुण्यापाठोपाठ आता ठाण्यातही कोयता गँग सक्रिय?

**■ठाणे। प्रतिनिधी,**
कोयता गँगची दहशत मोडीत काढण्यासाठी पुणे पोलिसांनी अनेक जालीम उपाय केले असतानाच अशी गॅंग आता ठाणे शहरातही डोके वर काढू लागली आहे. ठाण्यातील कोलशेत परिसरात भर दिवसा लोकांना हे दृश्य पाहायला मिळाले. हातात कोयता घेऊन ही मुले परिसरात खंडणी उकळत असल्याचे सांगण्यात येते. या घटनेमुळे परिसरात दहशत पसरली आहे.

याबाबतचे सूत्राकडून समजलेले अधिकृत असे की, कापूरवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोलशेत परिसरात असलेल्या लोढा संकुलाजवळ एका फेरीवाल्याकडून काही गुंड प्रवृत्तीची मुले हफ्ता मागत होते. त्या फेरीवाल्याने हफ्ता देण्यास नकार दिल्याने त्या गुंडांनी फेरीवाल्याला कोयात्याचा धाक दाखवला. सोमवारी (ता.१२) भर दिवसा रस्त्यावर ही घटना घडली. पाच जणांच्या तरुणांमध्ये दोघे तरुण हातात कोयता घेऊन या ठिकाणी फिरत होते. याबाबतचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर कापूरबावडी पोलीस ॲक्शन मोडमध्ये आले. लागलीच त्यांनी या संदभार्ची माहिती घेऊन गुन्हा दाखल करून घेण्याचे प्रक्रिया सुरू केली. दरम्यान पुण्यामध्ये कोयता गँगने चांगलाच धुमाकूळ घातलेला आहे. पोलिसांकडून कठोर कारवाई सुरू असूनही ही गॅंग पूर्णतः संपवण्यास पुणे



पोलिसांना यश आलेले दिसत नाही. त्यामुळे पुण्यामध्ये या गँगची चांगलीच दहशत पसरलेली पाहायला मिळते. आता हातात कोयते घेऊन भर दिवसा रस्त्यावर फिरण्याचे फॅड ठाण्यातही येऊन पोहोचले आहे. ठाण्यातील उच्चभ्रू लोकांची वसाहत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोलशेत येथील लोढा परिसरात काही तरुण मुले हातात कोयते घेऊन बिनधास्तपणे भर दिवसा फिरत असलेले दिसले. विशेष म्हणजे या परिसरापासून कापूरबावडी पोलीस ठाणे जवळच आहे. याबाबत कापूरवाडी पोलीस ठाण्याशी संपर्क साधला असता ही घटना किरकोळ असून त्याबाबत गुन्हा दाखल होण्याची प्रक्रिया सुरू आहे असे सांगितले.

# पैसे दिले नाही म्हणून कल्याणमध्ये चालकावर हल्ला

**■कल्याण । प्रतिनिधी,**
पैसे आणि मोबाईलची मागणी पूर्ण केली नाही म्हणून शनिवारी रात्री साडे बारा वाजता कल्याण पूवेर्तील खडेगोळवली भागात दोन जणांनी ठाण्यातील एका मोटार चालकावर चाकूचा हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले.

याप्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनीषकुमार ओमप्रकाश मिश्रा (३३) असे तक्रारदाराचे नाव आहे. तो ठाण्यातील घोडबंदर भागात राहतो. अरबाज शेख आणि त्याचा एक साथीदार हे या प्रकरणात आरोपी आहेत. खडेगोळवली प्रथमेश नगर भागात ही घटना घडली आहे.

पोलिसांनी सांगितले, तक्रारदार मनीषकुमार हे कल्याण पूवेर्तील खडेगोळवली भागातील प्रथमेशनगर भागात राहत असलेल्या जगदीश शुक्ल यांच्याकडे शनिवारी रात्री मुक्काम करण्यासाठी मोटारीने येत होते. रात्री साडे बाराच्या सुमारास मनीषकुमार कार घेऊन प्रथमेशनगर भागातून जात होते. त्यांना अचानक आरोपी अरबाज आणि त्याच्या साथीदाराने अडविले.

मनीषकुमार यांनी खिडकीची काच खाली घेतली. त्यावेळी आरोपींनी मनीषकुमार यांच्याकडे पैसे आणि मोबाईल देण्याची मागणी केली. आपल्याकडे



पैसे नाहीत आणि मोबाईल आपण देऊ शकत नाही, असे तक्रारदाराने सांगताच आरोपी अरबाजला राग आला.

त्याने चालकाला काही कळण्या्च्या आत त्याच्या मानेवर आणि पोटारवर चाकुने वार केले. मनीषकुमार यांनी आरोपींना रोखण्याचा प्रयत्न केला. ते ऐकत नव्हते. अरबाज शेख आणि त्याच्या साथीदाराने लाकडी दांडक्याने मनीषकुमार यांच्या वाहनाची काच फोडली. दुखापत झाल्याने तक्रारदाराने कोळसेवाडी पोलीस ठाण्यात आरोपींविरूध्द तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# कल्याणमध्ये भव्य सीटी पार्क, गौरीपाडा येथे मनोरंजन, विरंगुळ्याचे प्रशस्त ठिकाण

**■कल्याण। प्रतिनिधी,**
कल्याणमधील गौरीपाडा येथील एक लाख २१ हजार ६०० चौरस मीटर जागेत कल्याण डोंबिवली पालिकेच्या स्मार्ट सिटी विभागाने सीटी पार्क विकसित केले आहे. मनोरंजन, विरंगुळ्याचे प्रशस्त ठिकाण यानिमित्ताने कल्याण शहराच्या वेशीवर उपलब्ध झाले आहे. मनोरंजनासाठी फिरायला कुठे जायाचे ही कल्याण, डोंबिवलीतील नागरिकांची अडचण सीटी पार्कमुळे दूर झाली आहे. कल्याण पश्चिमेतील गौरीपाडा येथे वालधुनी नदीच्या काठी टाऊन पार्क या पालिकेच्या आरक्षित भूखंडावर सीटी पार्क विकसित करण्यात आले आहे. ६९ कोटी ६६ लाख रुपये या प्रकल्पावर खर्च झाले आहेत. नवी दिल्लीतील मेसर्स डिझाईन रेकॉर्ड या समंत्रक संस्थेच्या प्रकल्प अहवालानुसार सीटी पार्कची उभारणी करण्यात आली आहे. कल्याण शहरातील नागरिकांना आतापर्यंत काळा तलाव, दुगार्डी गणेश घाट हीच विरंगुळ्याची ठिकाणे होती. गणेश घाट भागात आधारवाडी कचराभूमीची दुगंर्धी येत असल्याने नागरिक या भागात आरोग्याचा विचार करून पाठ फिरवतात. घरी पाहुणा आला तर त्याला फिरायला कुठे न्यायचे अशी अडचण कल्याणमधील नागरिकांची होती. ही अडचण सीटी पार्कमुळे दूर होणार आहे.

पार्कमधील सुविधा सीटी पार्कमध्ये तलाव असणार आहे. उंच ठिकाणी बसून परिसर पाहता येईल अशी सुविधा आहे. विविध पद्धतीची हिरवळ भौगोलिक रचनेप्रमाणे येथे बसविली जाणार आहे. एक हजार मीटर लांब, चार मीटर रुंदीचा चलत मार्ग नागरिकांसाठी उपलब्ध असणार आहे. लहान सिनेमा गृह, उपहारगृह, लहान मुलांसाठी स्वतंत्र मनोरंजन मैदान, खेळणी, मेजवानी



ठिकाण, वालधुनी नदी किनारा ते पार्कच्या भागात उंच भराव आणि विद्युत रोषणाई. सीटी पार्कमध्ये येणाऱ्या नागरिकांना वाहने उभी करण्यासाठी वाहनतळ सुविधा आहे. सीटी पार्कला पावसाळ्यात पुराच्या पाण्याचा धोका नको म्हणून वालधुनी नदी काठ परिसरात उंच संरक्षित भिंत बांधली जाणार आहे. पूर रेषेपर्यंत भराव घालून सीटी पार्क संरक्षित केला जाणार आहे. बारमाही सीटी पार्कचा नागरिकांना लाभ घेता आला पाहिजे, अशी रचना याठिकाणी करण्यात आली आहे. प्रकल्प निसर्ग रम्य दिसण्यासाठी बाराशे वृक्ष लावण्यात आले आहेत. यामध्ये देशी प्रजातीची पसारा असणारी १२ झाडे लावण्यात आली आहेत. नागरिकांना आपल्या शहरात मनोरंजनाची प्रशस्त सुविधा उपलब्ध व्हावी या विचारातून सिटी पार्कची उभारणी करण्यात आली आहे. या पार्कचे उद्घाटन झाल्यानंतर पार्क देखभाल नियोजनासाठी कल्याण डोंबिवली पालिकेकडे हस्तांतरित केला जाईल.

# खारघरमध्ये 'हायवे ब्रेक' हॉटेलला भीषण आग



**■पनवेल । प्रतिनिधी,**
पनवेल शीव महामार्गावरील खारघर येथील ‘हायवे ब्रेक’ या हॉटेलला रविवारी मध्यरात्री पावणेदोन वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीमध्ये हॉटेलचे फर्निचर आणि सजावट खाक झाले. मात्र हॉटेल बंद असल्याने कोणतीही जीवितहाणी झाली नाही. खारघर अग्निशमन दलाच्या बंबाने दोन तासांत आगीवर नियंत्रण मिळवले. खारघर येथील हायवे ब्रेक या हॉटेलला रविवारी रात्री एक वाजून ४० मिनिटांनी आग लागल्याचे समजताच काही मिनिटांत येथे खारघर येथील सिडको महामंडळाच्या अग्निशमन दलाच्या पथकाने आग नियंत्रणासाठी धाव घेतली. हे हॉटेल पनवेल शीव महामार्गाला खेटून असल्याने कोपरा गावातील आणि खारघर वसाहतीमधील रहिवासी घटनास्थळी जमा झाले. हॉटेल बंद झाल्याने तातडीने हॉटेलच्या कर्मचारी व व्यवस्थापनाने हॉटेल उघडून अग्निशमन दलाच्या जवानांना आत प्रवेश करण्यासाठी वाट करुन दिली. मात्र तोपर्यंत आगीने संपूर्ण हॉटेल खाक झाले होते. यापूर्वी २०१९ मध्ये सुद्धा याच हॉटेलला आग लागली होती. त्यावेळेस अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी हॉटेल व्यवस्थापनाला अग्निसूरक्षा यंत्रणा लावण्याची आणि हॉटेलमधील पोटमाळ्यातून आपत्तीवेळी बाहेर पडण्यासाठी वेगळा दरवाजा काढण्याची सूचना केली होती. मात्र हॉटेल व्यवस्थापनाने सूरक्षा यंत्रणा लावली आणि दरवाजा सुद्धा स्वतंत्र काढला मात्र तरीही रविवारी पुन्हा याच हॉटेलला आग लागली. नेमकी आग का लागली याचे कारण अद्याप अग्निशमन यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना समजू शकले नाही. मात्र हॉटेलमध्ये हवा मोकळी नसणे, काचांच्या आणि आग झपाट्याने लागणाऱ्या वस्तूंचा सजावटीमध्ये अतिवापर केल्याने आगीच्या लोटांनी काही मिनिटांमध्ये हॉटेल खाक केले.

# वाहतूक धोरण राबविण्यात उदासिनता



**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**
शहरातील वाहूतक कोंडीची समस्या दूर करण्यासाठी तयार करण्यात आलेले वाहतूक धोरण केवळ कागदोपत्रीच राहिले आहे. ते लागू करण्यासंदर्भात महापालिकांची उदासिनता दिसून येत आहे. शहरातील वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या आणि अरुंद रस्ते यामुळे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस अधिकच तीव्र होऊ लागली आहे. दुसरीकडे शहराच्या रस्त्यांवर दररोज सरासरी २०० नव्या वाहनांची भर पडत आहे वसई विरार तसेच मीरा भाईंदर शहरात अरुंद रस्ते असून वाढत्या लोकसंख्येमुळे वाहनांची संख्या वाढत आहे. यामुळे शहरात वाहतुकीची समस्या निर्माण होऊ लागली आहे. अनेक ठिकाणच्या रस्त्यावर वाहनांच्या सकाळ संध्याकाळ रांगा लागलेल्या असतात तर काही ठिकाणी वाहने मध्येच उभी केली जात असल्याने नागरिकांच्या रहदारीच्या मार्गात अडथळे निर्माण होतात. तर दुसरीकडे वाहने उभी करण्याची जागा निश्चित नसल्याने वाहनधारकांनी वाहने लावायची असा प्रश्न पडतो. रेल्वे स्थानक, बाजारपेठा, शासकीय कार्यालये आदी ठिकाणी नागरिकांना वारंवार जावे लागते. तेथे वाहने उभी केली तर वाहतूक पोलीस ती उचलून नेतात आणि ते सोडविण्यासाठी वाहनधारकांना मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. मीरा भाईंदर, वसई विरार शहरात नव्या वाहनांची संख्या देखील वाढत आहे. या वाढत्या वाहनांचा भार रस्त्यावर पडत असतो. त्यामुळे वाहतूक नियोजन करणे कठीण होऊन बसले. वाहतूक कोंडी, वाहनतळ प्रश्न अशा अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. यासाठी सप्टेंबर २०२३ मध्ये मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातर्फे वाहतूक धोरण निश्चित करण्यात आले होते. त्यासाठी शहराचे सर्वेक्षण, वाहतूक समस्या आदींचा अभ्यास करण्यात आला होता. या वाहतूक धोरणात अती गदीर्ची ठिकाणे, रेल्वे स्थानक परिसर, बाजार पेठा, ये-जा करण्याचे मुख्य मार्ग, रुग्णालये, शाळा महाविद्यालयीन परिसर अशा भागातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी उपाययोजनांचा समावेश करून सविस्तर आराखडा तयार करण्यात आला होता.